# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**ठाणे येथील कळवा ते मुंब्रा रेल्वे मार्गावर एकही ओव्हरब्रीज (आरओबी) नसल्यामुळे खारेगाव येथे रेल्वे फाटकाजवळ उड्डाणपुल उभारण्याबाबत**

**(१) ५९९ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा ते मुंब्रा रेल्वे मार्गाला समांतर मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असून रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठी या मार्गावर एकही ओव्हरब्रीज (आरओबी) नसल्यामुळे खारेगाव येथे रेल्वे फाटकाजवळ उड्डाणपुल उभारुन जोडरस्ते बांधण्यास मंजूरी मिळालेली असतांनाही महानगरपालिकेने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होत असून येथील नागरीकांच्या सोयीसाठी त्वरेने आरओबी उभारण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) नाही.

ठाणे येथील कळवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्र. २८/सी येथे रेल्वेमार्गावरील उड्डाणपुल (आरओबी) बांधणे प्रस्तावित आहे. सदरचा आरओबी ठाणे महानगरपालिका व मध्य रेल्वे यांच्या संयुक्त भागीदारामधून बांधण्यात येणार असून असा करारनामा २००८ साली आला आहे. या करारनाम्यानुसार रेल्वेमार्गावरील मुख्य पूलांचे बांधकाम मध्य रेल्वेमार्फत करण्यात येत असून पूलाच्या जोडरस्त्यांचे काम ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

रेल्वेमार्गावरील मुख्य पूलाचे बांधकाम मध्य रेल्वेमार्फत हाती घेण्यात आले असून पुलाच्या जोडरस्त्यांसाठीच्या आवश्यक जागेचे भुसंपादन पुर्ण झाले नसले तरी महानगरपालिकेमार्फत पूलांच्या जोडरस्त्यासाठीच्या कामासाठी दिनांक २०.१०.२०१४ नुसार निविदा मागविण्यात आल्या. तसेच त्यांचा तांत्रिक लिफाफा दिनांक १०.०२.२०१५ रोजी उघडण्यात आला असून पुलाच्या जोडरस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही समातररित्या चालू आहे.

(२) व (३) ठाणे येथील कळवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्र. २८/सी येथे बांधण्यात येत असलेल्या मौजे कळवा येथील रेल्वेमार्गावरील उड्डाणपूल (आरओबी) व त्यांचे जोडरस्ते बांधण्यासाठी ठाणे शहराचे मंजूर विकास योजनेनुसार नियोजीत ६०.०० मी रुंद रस्त्यापैकीच्या जागेमध्ये आहे. यासाठी ५०,३३७.१७ चौ.मी. चे क्षेत्र आवश्यक आहे. रेल्वे मालकी क्षेत्रावरील पूलाचे बांधकाम मध्य रेल्वेमार्फत प्रगतीपथावर आहे. जोडरस्ता जागेसाठी शासन मालकीचे क्षेत्र हस्तांतरणासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मागणी करण्यात आली असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्र मे. मफतलाल इंजिनिअरींग इंडस्ट्रीज कंपनीचे मालकीचे आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या जमिनीचा ताबा कोर्ट रिसिव्हर यांचेकडे आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयामध्ये नोटीस ऑफ मोशनद्वारे विनंती करण्यात आली होती. तथापि, सदर दाव्यामध्ये कंपनीच्या जागेवरील आरक्षित भूखंड करारनामान्वये अथवा भूसंपादन कायद्यातधील तरतूदींनुसार संपादीत करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच सहमती करारनामा अन्वये भूसंपादन ठाणे महापालिकेच्या प्रयत्नास यश न आल्याने सदर जागेचे भूसंपादन करणेबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

---

**वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभगातर्फे मागणी केलेल्या ६० मार्गांना परवानगी मिळणेबाबत**

**(२) १८५८ (२३-१२-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे ६० नवीन मार्ग सुरु करण्यासाठी रिजनल ट्रान्सपोर्ट ऑथॉरिटी, ठाणे यांचेकडून परवानगी मिळणेसाठी माहे जानेवारी, २०१४ मध्ये व तद्पूर्वी मागील १ वर्षापासून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रसतावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे पाठविण्यात आलेल्या सदरहू प्रस्तावास विनाविलंब मंजूरी मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या परिहवहन विभागातर्फे मागणी केलेल्या प्रस्तावित मार्गापैकी मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण-रिजनल ट्रान्सपोर्ट ऑथरिटी, यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात येणा-या ५९ नवीन मार्गावर महानगरपालिकेस परिवहन सेवा सुरु करण्याकरीता दिनांक २४.४.२०१५ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील ४ नगरपरिषदांच्या अंतर्गत दलित वस्ती सुधारण्याची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३) २५६९ (२३-१२-२०१४). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील ४ नगरपरिषदांच्या अंतर्गत दलित वस्ती सुधारणा करण्यासाठी ११ कोटी २२ लक्ष रुपयांचे काम मागील सहा महिन्यापांसून जिल्हाधिकारी यांनी परवानगी न दिल्यामुळे शासन स्तरावर मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन या कामांना कधीपर्यंत मंजूरी देणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) व (२) नाही. वाशिम, रिसोड, मंगरूळपीर व कारंजा या चार नगरपरिषदांकडे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत अखर्चित असलेल्या रू. ११,२२,२९,९१६/- इतक्या अनुदानाच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकारी वाशिम यांनी शासनाचे मार्गदर्शन मागितले होते. सदर नगरपरिषदांना त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे आधी त्यांना वितरित केलेल्या निधीची विनियोग प्रमाणपत्रे उपलब्ध करून न घेता वर्षानुवर्षे निधी वितरीत करणे ही गंभीर अनियमितता असल्यामुळे त्याबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याविषयी जिल्हाधिकारी, वाशिम यांना दि.२१/७/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, नागरी दलित वस्ती सुधारणा ही जिल्हास्तरीय योजना आहे. या योजनेखालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीला आहेत.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## वाशीनाका आर.सी.मार्ग,चेंबूर,मुंबई या परिसरात प्रकल्प राबविताना बाधीत झालेल्या कुटुंबाचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत

**(४) २८७२ (२३-१२-२०१४). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीनाका, आर.सी.मार्ग चेंबुर, मुंबई या परिसरात एम.एम.आर.डी.ए.ने मुंबईतील एम.यु.टी.पी. व एम.एम.आर.डी.ए., एम.यु.आय.पी.मीठी नदी व एस.आर.ए. या प्रकल्पाअंतर्गत मुंबई उपनगरात प्रकल्प राबविताना बाधीत झालेल्या १०,०७८ कुटुंबाचे कायमस्वरुपी पुनर्वसन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीमध्ये पुनर्वसन केलेल्यासाठी आवश्यक नसलेल्या दैनंदिन नागरी सुविधा, सार्वजनिक आरोग्य केंद्र, मार्केट, शाळा इत्यादी सुविधा उभारल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त एम.एम.आर.डी.ए. व आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे वारंवार निवेदने देवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय, तसेच दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी निवेदन देवून एम.एम.आर.डी.ए.आयुक्त व मुंबई महापालिका आयुक्त यांनी संयुक्त बैठक घ्यावी अशी मागणीही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे वा अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :**(१) व (२) पुनर्वसन वसाहतींच्या विकासामध्ये सार्वजनिक आरोग्य केंद्र, मार्केट, शाळा सुविधा विकासकाने पुरविण्याची तरतूद नाही. प्राधिकरणाने वाशीनाका परिसरात शैक्षणिक सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने रॉकलाईन, दिवाण व कुकरेजा या वसाहतीमध्ये ३ शाळा चालविण्यासाठी ७० सदनिका/गाळे उपलब्ध करुन दिल्या आहेत. गरजू प्रकल्पग्रस्तांना उपजिविकेचे साधन म्हणून १५ निवारे दुकानासाठी बांधून दिले असून वसाहतीमधील अनिवासी गाळ्यांमध्ये जीवनावश्यक वस्तू विकण्याचे व्यवसाय करण्यात येत आहेत.

(३) व (४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधी व प्राधिकरणाचे आधिकारी यांनी संयुक्त स्थळपाहणी केली असून पुनर्वसन वसाहतीमधील अंतर्गत रस्ते व मलनिःसारण व्यवस्थेची रु. २१.६३ कोटीची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचे व महानगरपालिकेसमवते संयुक्त बैठक आयोजित करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत नियोजित आहे.

---

**मुंबई म्हाडाने ट्राझीट कॅम्पमध्ये राहणा-या लोकांकरिता नव्याने घरे मिळण्यासाठी तयार केलेल्या मास्टर यादीबाबत**

**(५) ३७१४ (२३-१२-२०१४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई म्हाडाने ट्राझीट कॅम्प मध्ये राहणा-या लोकांकरीता नव्याने घरे मिळण्यासाठी मास्टर यादी तयार केलेली आहे व सदर यादी मध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळे असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या मास्टर यादीमध्ये किती लोकांचा समावेश आहे व त्यातून किती लोकांना घरे मिळणार आहेत,

(३) असल्यास, मास्टर यादी मध्ये पात्र ठरविण्यासाठी कोण-कोणती कागदपत्रे वैद्य ठरवले जातात,

(४) असल्यास, मुंबई मध्ये किती ठिकाणी इमारत बांधकाम प्रकल्प चालू आहेत व प्रत्येक ठिकाणी किती सदनिका उपलब्ध होणार आहेत,

(५) असल्यास, गरजू लोकांची यादी तसेच प्रतिक्षेत असणा-यांची यादी किती आहे व त्यांचे स्वरुप काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि सुनावणी दरम्यान ५१ अर्जदारांनी प्रथमदर्शनी बनावट कागदपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यामुळे सखोल चौकशीसाठी सदरची प्रकरणे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(२) प्राधिकरणाच्या धारेणानुसार दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी परत गाळ्यांच्या वितरणासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील अनुसरुन एकूण १४९७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त अर्जदारांच्या अर्जांवर निर्णय घेऊन दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी प्रारुप यादी म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रारुप यादीनुसार ३२३ अर्जदारांना पात्र, ११२५ अर्जदारांना अपात्र करण्यात आले असून विविध कारणास्तव ४९ प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात आलेली आहेत. सदर प्रारुप यादीवर ८३५ अर्जदारांचे दावे हरकती प्राप्त झाले आहे. सदर आर्जांवर आवश्यकतेनुसार सुनावणी घेऊन त्यांच्या दावे हरकती वर अंतीम निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु असून पात्र भाडेकरु/रहिवाशी यांना नियमानुसार अनुज्ञेय असलेले क्षेत्रफळ विचारात घेऊन गाळयांचे वितरण करण्यात येईल.

(३) बृहतसूचीवरुन गाळे वितरणासाठी पात्रता निश्चित करताना उपकर प्राप्त इमारतींच्या भाडेकरु/रहिवाशांनी सादर केलेले मूळ कागदपत्रे जसे निष्कासन सूचना, भाडेपावती, विद्युत देयक, संक्रमण गाळा वितरण आदेश व आवश्यकतेनुसार इतर शासकीय दस्तऐवज तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या मूळ अभिलेखातील निष्कासन सूचना स्थळप्रत, निष्कासन सूचना दिल्याची नोंदवही, मूळ भाडेकरु/रहिवाशीची यादी, भूसंपादन झाले असल्यास विशेष भूसंपादन अधिकारी यांनी राजपत्रात प्रसिध्द केलेली भोडकरु/रहिवाशीची यादी, मतदार यादी इत्यादी कागदपत्रे विचारात घेतली जातात.

(४) उपकरप्राप्त इमारतीच्या पात्र भोडकरु/रहिवाशी यांना बृहतसूचीवरुन गाळे वितरण करण्यासाठी ५९५ गाळे उपलब्ध असून त्यांचा जाहिरातीत समावेश करण्यात आला आहे.
(५) एकूण १४९७ अर्जदारांची प्राथमिक पात्रता निश्चित करण्यात आलेली असून ३२३ पात्र, ११२५ अपात्र व विविध कारणासाठी ४९ प्रकरणे अनिर्णित ठेवण्यात आलेले अर्जदारांची प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यावर ८३५ अर्जदारांनी त्यांचे दावे हरकती सादर केल्या आहेत. त्यांचे दावे हरकती विचारात घेता तसेच आवश्यकतेनुसार सुनावणी देऊन बृहतसूचीवरुन गाळे वितरणासाठी पात्र असलेल्या भोडकरु/रहिवाशांची अंतिम यादी प्रसिध्द करुन त्यांना गाळ्यांचे वितरण करण्यात येईल. त्यामुळे तूर्तास प्रतिक्षा यादीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील जलेश्वर तलावाच्या सुशोभीकरणाचे काम अंदाजपत्रकानुसार न केल्याबाबत**

**(६) ३७४७ (२३-१२-२०१४). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरातील जलेश्वर तलावाच्या सुशोभीकरणाचे काम अंदाजपत्रकानुसार न करता किरकोळ स्वरुपाची कामे प्रत्यक्षात करण्यात आली व देयके मात्र पूर्णपणे उचलण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामावर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे व त्याअंतर्गत कोणती कामे करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली परिसरातील औद्योगिक कारखान्यात अनियमितता आढळत असल्याबाबत**

**(७) ५३३२ (१०-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनाच्या कल्याण विभागीय कार्यालयांतर्गत कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर, वाडा, भिवंडी, मोखाडा, उल्हासनगर या

परिसरातील कारखान्यांमध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय विभागाच्या कार्यालयातील कर्मचा-यांची कमतरतामुळे कंपन्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे आगीच्या घटना घडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गेल्या वर्षभरात कल्याण, डोंबिवली परिसरातील औद्योगिक कारखान्यात अनियमितता आढळल्याने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनाने ८४ कारखानदारांच्या विरोधात खटले दाखल केल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्यामधील रासायनिक औषधे, खत, पेट्रोल केमिकल कागद, सिमेंट अशा उद्योगाचा समावेश आहे. तेथील प्रक्रिया गुंतागुंतीची असून उत्पादनासाठी काही कारखान्यांमध्ये ज्वालाग्रही रासायनी वापरली जात आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सह संचालक तसेच दोन सहाय्यक संचालक पदे रिक्त असल्याने इतका मोठा डोलारा अवघ्या १० कर्मचा-यांच्या खांद्यवर असून त्यांना मेहनत करावी लागत आहे, हे खरे आहे काय, तसेच कंपन्यांमधील अपघाताची संख्या वाढली असून आतापर्यंत १३ कामगारांना जीव गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय ?

(५) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच औद्योगिक सुरक्षा अधिकारी संचालनाची पदे तातडीने भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. प्रकाश मेहता (१७-०६-२०१५) :** (१) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कल्याण या विभागीय कार्यालयात अधिकाऱ्यांची संख्या अपुरी आहे, ही वस्तुस्थिती असली तरी उपलब्ध अधिकाऱ्यांकडून अतिधोकादायक व रासायनिक कारखान्यांचे निरीक्षण प्राधान्याने करण्यात येते व उर्वरीत उलब्ध वेळेनुसार अन्य कारखान्यांचे निरीक्षण करण्यात येत असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे कारखान्याच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होते, ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही,

(२) मे, २०१४ ते एप्रिल, २०१५ या वर्षभराच्या कालावधीत कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यांच्या भोगवटादाराविरुध्द विविध ६९ प्रकरणांमध्ये खटले दाखल करण्यात आले आहेत,

(३) काही कारखान्यांमध्ये ज्वालाग्राही रसायनांचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे,

(४) सह संचालक १ पद व सहाय्यक संचालकांची २ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे,

मे, २०१४ ते एप्रिल, २०१५ या कालावधीत १७ घटनांमध्ये २० कामगार मृत्युमुखी पडले आहेत, हे खरे आहे,

(५) व (६)

रिक्त पदे सरळ सेवेने तसेच पदोन्नतीच्या माध्यमातून भरण्याची प्रक्रिया शासन स्तरावरुन सुरु आहे,

**केंद्र शासनाच्या योजनेच्या धर्तीवर मुंबईत बेघर नागरिकांसाठी मुंबई महानगरपालिकेचे एकूण २५ नाईट शेल्टर प्रस्तावित केल्याबाबत**

**(८) ५५८५ (०८-०४-२०१४). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या योजनेच्या धर्तीवर मुंबईत बेघर नागरिकांसाठी मुंबई महानगरपालिकेचे एकूण २५ नाईट शेल्टर प्रस्तावित असून त्यापैकी सुमारे १४ नाईट शेल्टर जागा आणि निधीच्या अभावामुळे महानगरपालिकेस सुरु करणे शक्य झाले नाही, असे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेस सदरहू आश्रयगृहाच्या निर्मितीसाठी केंद्र शासनामार्फत ७५ टक्के निधी उपलब्ध करुन दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेस सदरहू आश्रयगृहांच्या उभारणीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी व जागा मिळवून देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०८-२०१५) :**(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ५४/२००९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस रात्र निवारे सुरु करण्यास जागेची व निधीची अडचण असल्याचे नमूद केले आहे.

(२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत विविध उपांगापैकी "शहरी बेघरांसाठी निवारा" उपलब्ध करुन देण्याच्या उपांगाचा समावेश आहे. त्यासाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के निधी उपलब्ध होणार आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस शहरी बेघरांसाठी निवारा बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने मुंबईतील म्हाडा, एम.एम.आर.डी.ए., एस.आर.ए. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मध्य व पश्चिम रेल्वे या संस्थांच्या अधिका-यांसोबत मुख्य सचिवांनी बैठक घेतली आहे. तसेच सचिव (नवि-२) यांच्या स्तरावरही बैठक घेण्यात आली असून जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच त्यासाठी आवश्यक असणारा निधी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मागदर्शक सूचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांच्या विस्ताराबाबत**

**(९) ५९५६ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांच्या विस्ताराबाबत लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच निविदा प्रक्रियेतील गोंधळामुळे सावित्रीबाई फुले यांच्या पुणे येथील स्मारकातील शिल्पे व भित्तीचित्रे वर्षभरापासून अडकून पडल्याने सदर स्मारक शिल्पांअभावी अपुर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) पुणे शहरातील महात्मा फुले यांच्या राज्य संरक्षित स्मारकाशेजारीच महात्मा फुले पेठ प्लॉट नं.२३१ या मिळकतीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचे बांधकाम पुणे महानगरपालिकेतर्फे पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर स्मारकाचे उद्‌घाटन दिनांक २ ऑगस्ट, २०१४ रोजी उद्‌घाटन करण्यात आलेले आहे.

सदर स्मारकामध्ये महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन चरित्रावर आधारित शिल्पे व म्युरल्स् करणेसाठी मुलभूत सोयी-सुविधा विशेष अनुदानांतर्गत निधी प्राप्त झालेला आहे. सदरची शिल्पे व म्युरल्सची निविदा प्रक्रिया पुणे महानगरपालिकेकडून पूर्ण करून शिल्पकारांस वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे संबंधित शिल्पकाराकडून शिल्पे व मुरल्सची कामे चालू आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या इमारतींचे आराखडे मंजूर नसतांना अनधिकृत बांधकाम केलेबाबत**

**(१०) ७०१७ (०७-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या इमारतींचे आराखडे मंजूर नसतांनाही बेकायदेशीर मजले उभारण्यात आल्याप्रकरणी नगरविकास विभागाने कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

कळवा रुग्णालयाचे बांधकाम महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन सन १९९१ या वर्षी पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच महासभेच्या मान्यतेने कळवा रुग्णालयाच्या इमारतीवरील वाढीव मजल्याचे बांधकाम सन १९९६ या वर्षी पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर कळवा रुग्णालयाच्या बांधकामाच्या आराखड्याकरीता तत्कालीनवेळी बांधकाम परवानगी, प्रारंभ प्रमाणपत्र यासाठी स्वतंत्र मंजूरी घेतलेली आढळून येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील शिवाई नगर परिसरातील प्रभागात मलःनिसारणाची व्यवस्था करण्याबाबत

**(११) ७२४६ (०६-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील शिवाई नगर परिसरातील प्रभागात मलःनिसारणाची व्यवस्था नसून फुटपाथवर अतिक्रमण झाल्याचे व याच प्रभागात म्हाडाचे भुखंड विकासकाने गिळंकृत केल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती मलःनिसारण व्यवस्था फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याबाबत तसेच म्हाडाचे भुखंड गिळंकृत करणाऱ्या विकासकांवर व भुमाफियांवर कोणती कडक कार्यवाही करण्यात आली,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शिवाईनगर परिसरात म्हाडाची मल:निस्सारण व्यवस्था कार्यान्वित असून त्याद्वारे सेप्टीक टँकमध्ये सांडपाण्याचा निचरा होत आहे.

तसेच शिवाईनगर प्रभाग समितीमधील परीसरामध्ये जानेवारी, २०१५ मध्ये फुटपाथवरील ५२ फेरीवाले, ५४ हातगाड्या यांचे अतिक्रमण हटविण्याची कारवाई ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

सदर प्रभागात म्हाडाचे भुखंड विकासकाने गिळंकृत केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या घाणेवाडी जलाशयाच्या परिसरात सुधारणा करून उद्यान निर्मिती करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१२) ७७८९ (०६-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या घाणेवाडी जलाशयाच्या परिसरात सुधारणा करून उद्यान निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील अस्वच्छता, गाळ काढणे, पर्यटन स्थळ बनवणे इ.कामे उद्यानाबरोबरच सदर प्रस्तावात समाविष्ट करण्यात आली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई सिडको हद्दीतील कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे मोकळ्या जागेत कचऱ्याचे ढिग साचले असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(१३) ८१६७ (०६-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, सिडको हद्दीतील कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील बसस्थानक, फायर बिग्रेड, कळंबोली सेक्टर ४, ५, ६ येथील मोकळ्या जागेत कचऱ्याचे ढिग साचले असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळे घंटागाड्यामधून रोजच्या रोज कचरा उचलला जात नसल्यामुळे कचऱ्याचे ढिग मोठ्या प्रमाणात साचल्यामुळे दुर्गंधी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित ठेकेदाराविरुध्द व कचरा रोजच्या रोज उचलण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१५) :** (१) व (२) सिडकोने कचरा व्यवस्थापनाचे काम हे बि.व्ही.जी.लि. या कंपनीस ५ वर्षाच्या मुदतीकरीता कंत्राटी तत्वावर दिले आहे. सदर कंपनी आपले काम नियमित करत असून कचरा रोच्या रोज उचलला जातो आणि दुर्गंधी पसरली जाणार नाही याची काळजी घेतली जाते. गोळा केलेला कचरा तळोजा येथील चाळ क्षेपनभूमीवर टाकला जाऊन त्यावर प्रक्रिया केली जाते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील वसाहतीमध्ये डेंग्यु व काविळीच्या साथीने थैमान घातल्याबाबत**

**(१४) ८१८४ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील वसाहतीतील नागरिकांना ज्या जलवाहिन्यांतून पाणी पुरवठा होत आहे, त्या काही ठिकाणी नाल्यातून गेल्या आहेत. वसाहतीमध्ये एकीकडे डेंग्यु व काविळीच्या साथीने थैमान घातले असतांना मलमिश्रीत पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यातील जलवाहिन्यांच्या चाव्यामधून मलमिश्रीत पाणी शिरून ते थेट नागरिकांच्या शरिरात जात असल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१५) :** (१) व (२) नाही. सिडकोचे पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या कुठल्याही ठिकाणी नाल्यातुन जात नाही. तथापि, गृहनिर्माण संस्था परिसरातील काही जलवाहिन्या, पावसाळी नाले व मलमिश्रीत पाणी वाहून नेणाऱ्या नलिकांच्या संपर्कात येतात. सदर जलवाहिन्यांची दुरुस्ती व देखभाल करण्याची जबाबदारी गृहनिर्माण संस्थेची आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव ते आसोदा (जि.जळगांव) या मार्गावर पडलेल्या खड्डयांमुळे होत असलेले अपघात**

**(१५) ८९१३ (१०-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव ते आसोदा (जि.जळगांव) या मार्गावर पडलेल्या मोठमोठया खड्डयामुळे

दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास कृष्णा गणपत नेहाले (७५) या वृध्दाचा भीषण अपघाती मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेनंतर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी तब्बल दोन ते अडीच तास 'रास्ता रोको' आंदोलन करून सदर रस्ता नव्याने करण्याची मागणी संबंधित अधिका-यांकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१५) :** (१) दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी कृष्णा गणपत नेहते वय ७५ या वृध्दाचा अपघाती मृत्यू झाला, हे खरे आहे,
(२) होय.
(३) व (४) सदर रस्ता विकास योजनेनुसार १८ मी. रुंदीचा असून सदरील रस्त्याची दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. महानगरपालिकेने सदर रस्ता नवीन करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविली असून, मक्तेदारास दिनांक ०२.०२.२०१५ रोजी कार्यादेश दिले आहेत.

तथापि, महानगरपालिका फंडातील इतर कामाचे मेक्तेदाराचे देयक अदा कले गेले नसल्याने सदर मक्तेदार काम करण्यास उत्सुक नाही. तथापि सदर काम करणे आवश्यक असल्याने वरील कार्यादेश रद्द करुन इतर शासकीय निधीअंतर्गत काम घेण्याचे महानगरपालिकामार्फत प्रस्तावित आहे.

---

**लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील लिंगायत स्मशान भूमीच्या जागा संपादनाबाबत**

**(१६) १००७५ (०६-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे लिंगायत स्मशान भुमीची जागा संपादन करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी नगर परिषद अहमदपूर यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मशानभूमी जागा संपादनासाठीच्या निधी उपलब्धतेवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१५) :** (१) होय.

(२) आरक्षणाखालील जमिनीच्या भूसंपादनापोटी नुकसानभरपाई नगरपरिषेमार्फत केली जाते. त्याकरीता शासनाची कोणतीही योजना नाही. १३ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाची मार्गदर्शक तत्वे विहीत करणा-या दि. २५.१०.२०१० च्या शासन निर्णयान्वये विकास आराखड्यातील आरक्षणे विकसित करणे व त्यासाठी भूसंपादन करणे यासाठी सदर अनुदान खर्च करण्याची तरतूद असून त्यानुसार अहमदपूर नगरपरिषद त्यांना १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधीतून आवश्यक ती रक्कम खर्च करु शकते. याबाबत अहमदपूर नगरपरिषदेस दि. ३.७.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर मधील सुमारे ७० हजार विडी कामगारांच्या वेतनवाढीबाबत**

**(१७) १०१६८ (१०-०४-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात सुमारे ७० हजार विडी कामगार असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न किमान वेतनवाढीवरुन निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान वेतनवाढ अवाजवी असल्याचे सांगत कारखानदारांनी रोजगारात मोठी कपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्हयातील ७० हजार विडी कामगारांच्या रोजगार प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने घेऊन विडी कामगारांचा रोजगाराचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सध्या विडी कामगारांना १००० विड्या वळण्याचे माप देण्यात येत असून त्यांच्या रोजगारात कोणत्याही प्रकारची कपात झालेली नाही.

(३) शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ च्या शासन अधिसूचनेन्वये जारी केलेले सुधारित किमान वेतन देण्यासंदर्भात मालक संघटना व कामगार संघटना यांच्यामध्ये वाद आहे, ही वस्तुस्थिती आहे.

वरील अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेल्या किमान वेतन दराची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मालक संघटना व कामगार संघटना यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे शासन स्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील सात नगरपालिका आणि परभणी महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवर असलेल्या ९८६ कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खातेच उघडले गेले नसल्याबाबत**

**(१८) ११०१३ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील सात नगरपालिका आणि परभणी महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवर असलेल्या ९८६ कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खातेच उघडले गेले नसल्याचे धक्कादायक बाब नुकतीच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाते उघडण्यात न आल्यामुळे कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) काही प्रकरणी भविष्य निर्वाह निधीचे खाते न उघडल्यामुळे कर्मचा-यांची गैरसोय झाली हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी परभणी यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त होताच नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**सशक्त कर प्रणाली लागू करण्याबाबत**

**(१९) ११४५० (०७-०४-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने रखडलेल्या योजना पुर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाला राज्य शासनाकडून अनुदान मिळावे अथवा करप्रणाली बळकट करुन महापालिकेला स्वावलंबी करण्याबाबत सशक्त कर प्रणाली लागू करण्यासाठी राज्य शासनाकडे शिफारस करावी अशी मागणी राज्य वित्त आयोगाच्या अध्यक्षांची दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर यांनी भेट घेऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने राज्य वित्त आयोगाच्या अध्यक्षाने सदर मागणी राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठविली आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने उल्हासनगर महापालिकेची मागणी मंजूर केली आहे काय वा त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानकोली ते भिवंडी बायपास आणि तेथून थेट ठाण्यापर्यंत रस्ता तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२०) ११४७७ (१०-०४-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानकोली ते भिवंडी बायपास आणि तेथून थेट ठाण्यापर्यंत रस्ता तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी शासनाने मानकोली-मोटागाव लिंकरोड तयार करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार लिंकरोड अद्याप तयार न होण्याची कारणे काय आहेत व मानकोली ते भिवंडी बायपास आणि तेथून थेट ठाण्यापर्यंतचा रस्ता तयार करण्याचा शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप विचाराधीन प्रस्तावावर शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) माणकोली-मोटागांव रस्त्यावर मोटागांव येथे उल्हासखाडीवर ६ पदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे या कामाच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली असून प्राधिकरणामार्फत प्रथम टप्प्यात मुख्य पुलाचे काम हाती घेण्यात येणार असून त्यासंदर्भातील ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत तर दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग क्र.३ (माणकोली जंक्शन) पासून पुलापर्यंतचे काम हाती घेण्यात येणार आहे. माणकोली जक्शन पासून ठाण्यापर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वाहतुकीसाठी अस्तित्वात आहे.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ गाणे - खडपोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) वसाहतीमध्ये ठेकेदारीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन देण्याबाबत**

**(२१) १२४५१ (०७-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ गाणे - खडपोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) वसाहतीमध्ये ठेकेदारीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन, अत्यावश्यक सुविधा यापासून वंचित ठेवले जात असून तुटपुंज्या पगारावर राबवून घेण्यात येत असल्याच्या तक्रारी होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

किमान वेतन कायद्यासंबंधीची एक तक्रार मे.शारदा इंजिनिअरिंग, प्लॉट नं.सी, एमआयडीसी, गाणे-खडपोली, ता.चिपळूण या आस्थापनेविरुध्द प्राप्त झाली होती.

(२) होय, सदर आस्थापनेमध्ये तपासणी भेट देऊन किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत निरीक्षण शेरे पारीत करण्यात आले आहेत.

(३) उक्त नमूद निरीक्षण शेऱ्याचे पालन न केल्यामुळे संबंधित आस्थापनेच्या मालकाविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, चिपळून येथे खटला क्र. २२८/२०१५ दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा (ता.जि.पुणे) येथील स.न. २७ येथे मनोरुग्णालयाच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या बीएसयूपी घरांचे काम लाभार्थ्यांनी मागील अनेक दिवसांपासून बंद पाडले असल्याबाबत**

**(२२) १३००० (०७-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (ता.जि.पुणे) येथील स.न. २७ येथे मनोरुग्णालयाच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या बीएसयूपी घरांचे काम लाभार्थ्यांनी मागील अनेक दिवसांपासून बंद पाडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रमानगी येथील बीएसयुपी योजनेअंतर्गत १७८ लाभार्थ्यांचे घराचे काम सुरु असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ९२ घरांची कामे सुरु असून उर्वरित ८६ लाभार्थ्यांना एकसमान २७० चौरस फुट जागा मिळत नसल्याने मागील वर्षभरापासून या लाभार्थ्यांनी या योजनेला विरोध केला असून शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-१०-२०१५) :** (१) सदर ठिकाणी एकूण १७८ घरांपैकी १६० घरांना काम सुरु करण्याचे दाखले (सीसी) तेथील रहिवाशांचे संमतीपत्र घेवून देण्यात आलेले आहे. त्यापैकी एकूण ९० घरांची कामे चालु केलेली असून पैकी ११ घरे पूर्ण झालेली आहेत. १० घरे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत व उर्वरीत घरांची कामे प्रगतिथावर आहेत.

(२) व (३) सदर योजना इनसिटु म्हणजेच आहे त्याच जागी व लाभार्थ्यांच्या मूळ झोपडीचे क्षेत्रफळ कमीत कमी १०० चौ.फूट असल्यास त्या झोपडपट्टी धारकास सदर योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यानुसार १०० चौ.फूट व त्यापेक्षा जास्त वेगवेगळ्या घरांच्या क्षेत्रांकरिता टाईप १ ते ५ म्हणजेच १२५, १५०, १७५, २००, २५० चौ.फूट अशा क्षेत्रांच्या घरांचा ले-आऊट मान्य करुन घेवून कार्यवाही करण्यास सुरवात केली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ९० घरांची कामे सुरु करण्यात आली. परंतु ले-आऊट करताना १२ फुटांच्या रस्त्याकरीता जागा सोडणे आवश्यक असल्याने ले-आऊट मधील प्रत्येक घराचे क्षेत्रफळ त्यांचे मूळ फूट प्रिंटच्या क्षेत्रफळाच्या सुमारे १० ते २० टक्क्यांनी कमी झाले.

या प्रकल्पामध्ये घरांची कामे सुरु करण्यापूर्वी काही लाभार्थ्यांनी जरी पूर्वी संमती दाखविली होती तरी क्षेत्र कमी झाल्यामुळे त्यांनी त्यानंतर आक्षेप घेण्यास सुरुवात केली व जमीनीवरच २४० चौ. फूट+३० चौ.फूट जीना अशा क्षेत्रांच्या घरांची मागणी करण्यास सुरुवात केली. त्यांनी त्याकरीता साखळी उपोषण केले. त्यानंतर महापालिका आयुक्त, अतिरिक्त महापालिका आयुक्त व उप महापौर यांचे समवेत चंद्रमानननगर येथील झोपडपट्टीधारकांच्या बैठका होवून अस्तित्वातील जमीनीवर २४० चौ.फूट ची घरे बसत नसल्यामुळे वाढीव ७०० चौ.मी. जागेची मागणी महापालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्राने केलेली आहे.

---

**मुलुंड पश्चिम (मुंबई) शहरात मुलुंड कॉलनी येथे मलबार हिलच्या सुरुवातीला तीन नवीन इमारतीचे बांधकाम सुरु असल्याबाबत.**

**(२३) १४४१३ (०७-०४-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड पश्चिम (मुंबई) शहरात मुलुंड कॉलनी येथे मलबार हिलच्या सुरुवातीला तीन नवीन इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी लेखी व तोंडी तक्रार करुनही अद्याप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामाला संरक्षण देणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी आणि बांधकाम विकासकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१५) :** (१) बृहन्मुंबई महानगरालिकेच्या मुलुंड येथील “टी” विभागातील नोंदवहीतील अभिलेखाच्या नोंदणीनुसार १ डिसेंबर, २०१४ ते ३० फेब्रुवारी, २०१५ च्या दरम्यान मलबार हिल येथे एक अनधिकृत बांधकाम झाल्याची नोंद आढळते,
(२) हे खरे नाही. सदर ठिकाणचे स्थळ निरीक्षण करुन सदर अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबई महापालिका अधिनियमाच्या कलम ३५४ (अ) अन्वये कारवाई करुन त्याची एक प्रत मुलुंड (प.) येथील पोलीस ठाण्यात देऊन संबंधितांवर कलम ३५४ (अ) (ब) (२) अन्वये कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच सदर अनिधिकृत बांधकामाचे निष्कासन दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी करण्यात आलेले आहे. सदर बांधकाम सुरु असलेली जागा ही उपजिल्हाधिकारी यांच्या मालकीची असल्यामुळे सदर कारवाईची माहिती उपजिल्हाधिकारी (अति. निष्कासन ) यांना कळविण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या दी स्टीट व्हेंडर्स अधिनियम २०१४ नुसार जेजुरी (पुणे) येथे हातगाडीवाले, फेरीवाले, टपरीवाले यांच्या नियोजित व्यवस्थापनाबाबत**

**(२४) १४९८६ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या दी स्टीट व्हेंडर्स अधिनियम २०१४ नुसार जेजुरी (पुणे) येथे हातगाडीवाले, फेरीवाले, टपरीवाले यांच्या नियोजित व्यवस्थापनाची व त्यामध्ये नोंदणी असलेल्या फेरीवाल्यांना कायद्यानुसार व्यवसाय करुन दिला जाणार असल्याने त्यांना प्रमाणपत्र व ओळखपत्र बंधनकारक राहणार असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिनियमाची अंमलबजावणी राज्यातील इतर ठिकाणीही करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१५) :**(१) व (२) केंद्र शासनाच्या पथविक्रेता (उपजीविका, संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व शहरांमधील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करुन त्यांना ओळखपत्र देण्याची तरतूद आहे. त्यानुसार पथविक्रेता (उपजीविका, संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ च्या नियम ३६ व ३८ नुसार फेरीवाल्यांसाठी नियम व योजना तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महिला कर्मचाऱ्यांना रात्रपाळीत काम करण्यासाठी अनुमती देण्याबाबत**

**(२५) १६५४५ (११-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला कर्मचाऱ्यांना रात्रपाळीत म्हणजेच सायंकाळी ७ ते सकाळी ६ या वेळेत काम करण्यासाठी तसेच ओव्हर टाईमची मर्यादा ७५ तासांवरून ११५ तास करण्यासाठी अनुमती देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवडयात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार रात्रपाळीत काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१०-२०१५) :** (१) होय.

दिनांक २० मे, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये महिला कामगारांना सायंकाळी ७.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत स्वेच्छेने काम करण्यास असलेला प्रतिबंध शिथिल करणे, तसेच तिमाही कालावधीत ओव्हर टाईम (अतिकालिक) ची मर्यादा ७५ तासांवरुन ११५ तास अशी वाढवणे या तरतुदींचा समावेश आहे.

(२) महिला कामगारांच्या सुरक्षिततेबाबत मा. मद्रास उच्च न्यायालयाने न्यायनिर्णयात विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील अटी आणि शर्ती तसेच त्याव्यतिरिक्त अन्य सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजनांच्या विवक्षित अटींच्या मधीन राहून रात्रपाळीत काम करण्याची मुभा देण्यात येणार आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामगारांना कारखाना कायद्याचे संरक्षण मिळण्याबाबत**

**(२६) १६५४८ (१०-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार कायद्यात बदल केल्यामुळे यापुढे विजेच्या वापर करणाऱ्या उद्योगातील २० कामगार असलेल्या आणि विजेचा वापर न करणाऱ्या ४० कामगाराना शासनाने माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास असलेल्या कारखान्यांना कायद्याचे संरक्षण मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील १ लाख ९० हजार कामगारांना कारखाना कायद्याचे संरक्षण मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १ लाख ९० हजार कामगारांना सुरक्षा पुरविण्यासाठी कोणती पर्यायी उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्यापपर्यंत उपाययोजना करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१०-२०१५) :** (१) व (२) होय,

दिनांक २० मे, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये कलम २ (एम) या 'कारखाना' या संज्ञेच्या व्याखेत सुधारणा कारणे या तरतुदीचा समावेश आहे. त्यामुळे विजेच्या वापरावर चालणाऱ्या व विजेविना चालणाऱ्या कारखान्यांमधील कामगारांची संख्या अनुक्रमे २० व ४० असेल, अशा कारखान्यांना सुधारीत कायद्याचे संरक्षण मिळणार आहे.

त्यामुळे लहान कारखाने मूळ कायद्याच्या कार्यकक्षेबाहेर जाणार असून अशा कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुमारे १,९३,२०२ इतकी आहे.

(३) व (४)

सुरक्षिततेचे नियम न पाळणाऱ्या कारखान्यांविरुध्द कलम ८५ अन्वये कारवाई करण्याचे अधिकार शासनास आहेत.

---

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याबाबत**

**(२७) १६८२० (११-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देणा-या संस्था व व्यक्तींना दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वृतपत्रात जाहिरात देऊन सोसायटीच्या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते, मात्र मागील ४ दिवसापासून संकेतस्थळ बंद असल्याने अर्ज करणा-या संस्था व व्यक्तींची गैरसोय झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कौशल्य विकास सोसायटी यापूर्वी उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत स्थापना करण्यात करण्यात आली असून यांचे नांव आताच विकास व उद्योजकता विभागात विलिनीकरण करण्यात आले आहे, संकेतस्थळही नव्याने सुरु केले आहे, तांत्रिक अडचण निर्माण झाल्या आहेत हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) पूर्वी उच्च व तंत्र शिक्षण विभागअंतर्गत कार्यान्वित असलेली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आता नवनिर्मीत कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत कार्यरत आहे. सदर संकेत स्थळ दिनांक १ मे ते ४ मे, २०१५ या कालावधीमध्ये माहिती अद्ययावत करण्यासाठी पुर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. या संकतेस्थळाचे व्यवस्थापन सदर सोसायटी मार्फत करण्यात येत असून विलीनीकरणामुळे कोणत्याही तांत्रिक अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील संत गाडगेबाब विद्यापीठातील केंद्रीय मुल्यांकन विभागाच्या गुणवाढ प्रकरणात १६ आरोपींना अटक केल्याबाबत

**(२८) १६८२६ (१२-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठातील केंद्रीय मुल्यांकन विभागाच्या गुणवाढ प्रकरणात अद्यापपर्यंत १६ आरोपींना अटक करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोपीची पोलीस कोठडीत चौकशी करण्यात आल्यावर त्यांनीही आणखी काही विद्यार्थ्यांची नांवे पोलीसांना सांगितली होती त्या सर्व दोषींची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) परिक्षा नियंत्रक, सत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, फ्रेजरपूरा येथे गु.र.क्र. १००/२०१५, भा.दं.वि. कलम ४६८,४७१,१०९,३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी आतापर्यंत १७ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपींची जामीनावर मुक्तता करण्यात आली आहे.
या गुन्ह्यातील खाडाखोड केलेल्या गुणपत्रिका न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा कलिना, मुंबई येथे दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी पाठविण्यात आल्या आहेत.
सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील घरेलू व बांधकाम कामगार वगळता अन्य असंघटीत कामगारांना शिक्षणासाठी कोणतीही सुविधा सध्या उपलब्ध नसल्याबाबत**

**(२९) १७२३७ (११.०८.२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील घरेलू व बांधकाम कामगार वगळता अन्य असंघटीत कामगारांना शिक्षणासाठी कोणतीही सुविधा सद्या उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणच्या प्रत्येक असंघटीत कामगारांची नोंदणी करुन या कामगारांच्या शैक्षणिक मदतीसाठी योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१८-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. शासन निर्णय क्रमांक प्राधिकरण-३२००४/प्र.क्र.३४२/काम-७अ, दिनांक २४/१०/२००५ अन्वये सध्या आम आदमी विमा योजना (पूर्वीची जनश्री विमा योजना) १२२ व्यवसायांमध्ये काम करणा-या असंघटित कामगारांना लागू असून त्याअन्वये सदस्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शिक्षा सहयोग योजनेअंतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी तसेच आयटीआय कोर्स करित असल्यास, व दरवर्षी उत्तीर्ण होत असल्यास, दर तिमाहीकरिता प्रत्येकी रू.३००/- रक्कम (जास्तीत जास्त दोन मुलांकरिता) देण्यात येते.

असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ अन्वये राज्यातील असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरावर सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे, सदर मंडळामार्फत असंघटित कामगारांच्या मुलांकरिता शिक्षण सुविधा देणे या योजनेसह भविष्य निर्वाह निधी, रोजगार करताना अपघात घडल्यास सहाय्य, आवास योजना, अंत्य संस्कार सहाय्य, वृध्दापकालीन निवास यासारख्या योजना तयार करून राबवावयाच्या आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार श्रम शक्ती पहचान अभियानांतर्गत राज्यातील सर्वच असंघटीत कामगारांची नोंदणी करून त्यांना महात्मा फुले राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा (MPNSS) कार्ड वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**राज्यातील युवा बेरोजगारांसाठी रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) १७३११ (११-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील युवा बेरोजगारांसाठी रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शासनाच्या श्रम व रोजगार विभागाकडून रोजगार आणि बेरोजगारांची पाहणी करण्यात आली असून सध्या बुलढाणा जिल्ह्यात ७५ हजार युवक युवती रोजगारांच्या शोधात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) राज्यातील युवा बेरोजगारांसाठी रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार विभागाकडून मे, २०१५ वा त्यासुमारास पाहणी केल्याबाबतचा असा कोणताही तपशिल, अहवाल विभागाकडे उपलब्ध नाही. तथापि, मे, २०१५ अखेरीस बुलढाणा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांच्या नोंदणीपटावर ९१७६६ उमेदवारांची नोंद होती.

(२) राज्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून राज्य शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत खालील योजना राबविण्यात येत आहे.

१. रोजगार मेळावे,

२. बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था.

३. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना,

४. आदिवासी उमेदवारांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यात यावर्षी पीएमपीएलने स्कूलबसच्या प्रवास भाड्यात वाढ केल्याबाबत**

**(३१) १७३३२ (११-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात यावर्षी पीएमपीएलने स्कूलबसच्या प्रवास भाड्यात अचानक तब्बल (१४ हजार ५०० रुपये) तिपटीने वाढ केल्यामुळे पालकांमध्ये अनावर संताप निर्माण होऊन त्यांनी लक्ष्मी रस्त्यावरील हुजुरपागा येथे एकत्रित येऊन दरवाढ मागे घेण्याची मागणी केली असल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्कूलबसचे प्रवास भाडे कमी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१५) :**(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.मार्फ देण्यात येणाऱ्या सवलतीची रक्कम महानगरपालिकांकडून प्राप्त झाली नसल्याने, सन २०१५-१६ साठी विशेष विद्यार्थी बस योजनेसाठी प्रवास भाड्यात देण्यात येत असलेली ५० टक्के सवलत रद्द करुन १०० टक्के भाडे आकारणी करणेबाबत निर्णय परिवहन महामंडळाने घेतला आहे. सदर दरवाढ मागे घेण्याची मागणी प्राप्त झाली आहे.

(२) दिनांक २३ जुलै, २०१५ रोजीच्या पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये विशेष विद्यार्थी बस सेवेच्या भाड्यात २५ टक्क्याची सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शाळांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व विशेष विद्यार्थी बसेसच्या एकूण भाडे रक्कमेत माहे ऑगस्ट, २०१५ पासून २५ टक्के सवलत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात दगड खाणीमध्ये काम करणा-या कामगारांना मुलभूत सोईसुविधा मिळण्याबाबत

**(३२) १८०४० (११-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २७ ते २८ हजार दगड खाणी असून त्या दगड खाणीमध्ये काम करणा-या ८५ लाख कामगारांची शासनाकडे नोंद असून दगड खाणीच्या माध्यमातून शासनाला वर्षाकाठी करोडो रुपयांचा महसूल मिळकत देणारा खाण कामगार, देशाला स्वातंत्र्य मिळवून ६८ वर्षे होवूनही अन्न, वस्त्र, निवारा या सारख्या मुलभूत गरजापासून दुर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दगडखाण कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१८-०९-२०१५) :** (१) व (२) नाही तथापि,

केंद्र शासनाने असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ पारित केलेला असून दगडखाण कामगारांचा असंघटित कामगार या संज्ञेत समावेश होतो. असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ च्या कलम-१४ अन्वये महाराष्ट्र शासनाने दि.३०.५.२०१३ रोजीच्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २०१३ पारित केलेले आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम ६(१) अन्वये असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरीय

कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे. सदर मंडळ स्थापन झाल्यावर त्यामार्फत असंघटित कामगारांसाठीच्या (ज्यामध्ये दगडखाण कामगारांचाही समावेश असेल) विविध कल्याणकारी योजना राबविणे शक्य होईल.
(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**मोहोने (ता.कल्याण जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीमध्ये टाळेबंदी दाखवून येथील कामगारांची कोट्यावधींची देणी प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) १८२५२ (११-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोने (ता.कल्याण जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीमध्ये टाळेबंदी दाखवून येथील कामगारांची कोट्यावधींची देणी प्रलंबित असूनही शेकडो एकर जमीन विकासकाला विकून कमर्शिअल व निवासी सदनिकांचे टॉवर उभारण्याचा कंपनी व्यवस्थापनाचा डाव असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-१०-२०१५) :** (१) मे. एन.आर.सी.लि. मोहनेच्या कंपनी व्यवस्थापनाने बिकट आर्थिक परिस्थितीमुळे कंपनीच्या ताब्यातील ३३९ एकर इतकी जमीन मे.रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. यांना विकण्याचा करार (MOU) दिनांक १ मार्च, २००७ रोजी केला आहे. तर दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ पासून कारखान्यात टाळेबंदी लागू केली आहे व कामगारांची रु. ८२.४७ कोटी इतकी देणी प्रलंबित आहेत हे खरे आहे.
(२) व (३) होय,

दिनांक १६ जुलै, २००९ रोजी बीआयएफआरने सदर उद्योग आजारी म्हणून घोषित केला आहे. विविध विषयावर प्रकरणे मा.उच्च न्यायालय, मुंबई तथा मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे प्रलंबित आहेत. तसेच एन.आर.सी. मजदूर संघ या संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सध्या बँकेत जमा असलेले रु. २४.५० कोटी कामगारांना वाटप करण्यासाठी याचिका दाखल केली असून सदर याचिका प्रलंबित आहे. कामगारांची थकीत देणी अदा करण्याच्या दृष्टीने शासनाच्या विविध स्तरावर बैठका आयोजित करुन कामगारांच्या देय रकमा देण्याबाबत प्रयत्न केलेले आहेत. क्षेत्रिय कामगार कार्यालयाने व्यवस्थापनाविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत फौजदारी खटले दाखल केले होते. त्यामध्ये व्यवस्थापनास रु. ६०० दंड झाला. ५२८ कामगारांचे अर्ज Early Retirement Scheme अंतर्गत व्यवस्थापनाकडून मंजूरीसाठी प्रलंबित आहेत.

---

**शिवशाही झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) १८९३० (११-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १६ वर्षापासून युतीच्या सत्ता काळात स्थापना झालेल्या शिवशाही झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे काम निधीअभावी प्रलंबित असून कंपनीच्या तिजोरीत खडखडाड असल्याने ठेवीवरील व्याजातून कर्मचाऱ्यांचे पगार भागविले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(३) प्रश्न भाग (१) मधील उल्लेखित प्रकल्पाला अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-१०-२०१५) :** (१) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितने सुरुवातीला हाती घेतलेले काही झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प निधी अभावी धीम्या गतीने प्रगती करत होते पण मध्यंतरीच्या काळात हाती घेतलेले सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत. बहुतांश पुनर्वसन सदनिकांचे वाटप सुध्दा झाले आहे. उर्वरित पुनर्वसन सदनिका व अनिवासी गाळ्यांची विक्री येत्या काही महिन्यात करण्याचे नियोजित आहे.

सार्वजनिक क्षेत्रात असलेल्या बहुतांशी कंपन्याप्रमाणे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितसुध्दा ठेवींवरील व्याजातून दैनंदिन खर्च भागवीत आहे, हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवतनाही.

---

**रायगड जिल्हयातील खोपोली खालापूर परिसरात औद्योगिक सुरक्षा नियमाचे उल्लंघन केले जात असल्याबाबत**

**(३५) १८९४९ (३१-०७-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खोपोली खालापूर परिसरात लहान व मध्यम स्वरुपाचे २०० उद्योग कार्यान्वीत असून उद्योजकांकडून औद्योगिक नियम १९८५ नुसार औद्योगिक सुरक्षा नियमाचे उल्लंघन केले जात असल्याची बाब निदर्शनास आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१०-२०१५) :** (१) रायगड जिल्ह्यातील खोपोली, खालापूर, परिसरात कारखाने अधिनियमांतर्गत एकूण ३०९ नोदणीकृत कारखाने आहेत. त्यातील २७३ कारखान्यांना मागील २ वर्षात भेटी देऊन सुरक्षिततेबाबतच्या लेखी सूचना देण्यात आल्या, त्यापैकी २४ कारखान्यांमध्ये कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे उल्लंघन झाल्याचे आढळून आले , हे खरे आहे.
(२) होय, ज्या कारखान्यांनी सुरक्षितता नियमांचे उल्लघंन केलेले आहे, त्या कारखान्यांची चौकशी करुन कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या अंतर्गत त्या कारखान्यांच्या व्यवस्थापनावर एकूण ३४ फौजदारी खटले, मा.मुख्यन्यायदंडाधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयात दाखल केलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांची (एम्लॉमेन्ट एक्सचेंज)
जुनी वेबसाईट बंद करण्यात आल्याबाबत**

**(३६) १९२०० (११-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची (एम्लॉमेन्ट एक्सचेंज) ५ वर्षापूर्वी maharojgar.gov.in ही चालू करण्यात आलेली जुनी वेबसाईट बंद करण्यात आल्यामुळे राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांना गेल्या वर्षभरापासून ऑनलाईन नोकऱ्या देणे बंद झाल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारावर बेकारीची पाळी आली असल्याचे तसेच आता केवळ नाव नोंदणीचे काम सुरु असून इतर सर्व कामकाज बंद ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या देण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :** (१) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाची (पूर्वीचे रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास संचालनालय) पूर्वीची वेबसाईट http: ese.mah.nic.in अशी होती. तथापि, सर्वकष ई-प्रशासन प्रणाली प्रकल्पांतर्गत लाभार्थी घटकांना अधिक पारदर्शक व तत्परतेने सेवा देण्यासाठी www.maharojgar.gov.in अशी नवीन वेबसाईट सुरू करण्यात आलेली आहे. या संचालनालयामार्फत सुशिक्षित बेरोजगारांना प्रत्यक्ष नोकरी देण्यात येत नसून, नियोक्त्यांच्या मागणीप्रमाणे नोंदणीकृत उमेदवारांची यादी नियोक्त्यांना उपलब्ध करून दिली जाते. सध्या ऑनलाईन पध्दतीने वेबपोर्टलमार्फत नियोक्त्यांना युझरआयडी व पासवर्डद्वारे हे कामकाज परस्पर करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कामगार व औद्योगीक न्यायालयातील न्यायाधिशांची रिक्त पदे भरण्याताबत

**(३७) १९२०३ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार व औद्योगिक न्यायालयातील न्यायाधीशांची रिक्त पदे अनेक वर्ष न भरल्यामुळे इतर न्यायाधीशांवर अतिरीक्त कामांचा ताण पडत असल्याने कामगार न्यायालयात सुमारे ३८ हजार तर औद्योगिक न्यायालयात १९ हजार खटले प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार व औद्योगिक न्यायालयातील न्यायाधीशांची किती पदे रिक्त आहेत, केव्हापासून रिक्त आहेत व ती रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरह पदे भरण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व सदरहू पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-१०-२०१५) :** (१) होय.

(२) कामगार न्यायालयात ९ व औद्योगिक न्यायालयात १४ न्यायाधिशांची पदे विविध कालावधी पासून प्रशासकीय कारणास्तव रिक्त आहेत.

(३) न्यायाधीशांची पदे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून भरली जातात. सबब मा. उच्च न्यायालयास पद भरणेबाबत विनंती केली आहे.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गार्लिक कंपनीतील कामगारांची देणी न दिल्याबाबत

**(३८) १९३९८ (०६-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गार्लिक कंपनी दिनांक २७ ऑगस्ट, १९९१ रोजी कंपनी मालकाने जबरदस्तीने बंद केली परंतु सदर कंपनीतील कामगारांची देणी आजतागायत दिली नाही, हे खरे आहे काय, तसेच सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना कंपनीने २५ एकर जमिनीवर मॉल इंडस्ट्रीज, रेसिडेंट, कमर्शियल गाळे माहे जानेवारी २०१५ पासून बांधण्यास सुरुवात केली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,व चौकशीअंती सदर कंपनीतील कामगारांची देणी देण्याबाबत शासनाकडून व कंपनीमालकाकडून कोणती कार्यवाही करण्यात

आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही,

तथापि, व्यवस्थापनाने दिनांक १४ ऑक्टोबर, १९९१ रोजी टाळेबंदी घोषित केली होती, त्यावर शासनाने दिनांक २३ सप्टेंबर, १९९२ रोजी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले. सदरील आदेशास व्यवस्थापनेने मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सदरील याचिका मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असतांनाच व्यवस्थापनेने दिनांक २६ एप्रिल, १९९८ रोजी आस्थापना बंद केली आहे,

आस्थापना बंद करतेवेळी कार्यरत असलेल्या ९२ (६७+२५) कामगारांना व्यवस्थापनाने कायदेशीर देण्यापोटी रु. ३,२८,५५,१८१/- अदा केले असून शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी व्यवस्थापनास कामगारांची देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर व्यवस्थापनेने सदर जमिनीवर बांधकाम सुरु केले आहे हे खरे आहे काय,
(२) सदर बाबतीत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती सदर कंपनीतील कामगारांची कायदेशिर देणी दिल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही,

---

## पाचोरा (जि.जळगांव) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कोपा (कॉम्प्युटर ऑपरेटर प्रोग्रामिंग असिस्टंट) व मोटार मॅकॅनिक ट्रेड सुरु करण्याकरिता परवानगी देण्याबाबत

**(३९) १९७५१ (३०-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगांव) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कोपा (कॉम्प्युटर ऑपरेटर प्रोग्रामिंग असिस्टंट) व मोटार मॅकॅनिक ट्रेड सुरु करण्याकरिता वरिष्ठ पातळीवरुन परवानगी न मिळाल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये गेल्या तीन वर्षापासून परवानगी अभावी उक्त ट्रेडचे आलेले साहित्य वापराविना तसेच पडून आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ट्रेडला अद्यापपर्यंत परवानगी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त ट्रेडला परवानगी देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, उक्त ट्रेडला कोणत्या शैक्षणिक वर्षापासून सुरुवात करणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उक्त ट्रेडच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाच्या डी.जी.ई.टी. नवी दिल्ली यांची संलग्नता आवश्यक असून त्याबाबत पाठपुरावा चालू आहे

---

**ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी एसआरए योजना राबविण्याबाबत**

**(४०) १९९१० (११-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी एसआरए योजना राबविण्यात येणार असल्याची बाब दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचे सर्व्हेक्षण सुरू करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरामध्ये एसआरए योजना कोणकोणत्या प्रभागात व कधीपर्यंत सुरू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-१०-२०१५)** :(१) ठाणे महानगपालिका क्षेत्रासाठी ठाणे महानगरपलिकेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरडी) राबविण्यात येत होती. तथापि, शासन अधिसूचना गृहनिर्माण विभाग क्र.झोपुधो. ११०१/प्र.क्र.२०७/१४/झोपसु-१, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई क्षेत्रामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रामधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र.टीपीएस-१२१२/१२१/प्र.क्र.६२/१३/नवि-१२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ अन्वये "विशेष नियमावली" प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील स्वतंत्ररित्या कोणतेही सर्वेक्षण सुरु करण्याबाबत शासन स्तरावरुन सुचना देण्यात आलेल्या नाहीत. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील संरक्षणपात्र झोपड्यांसाठी असलेला पात्रता दिनांक १ जानेवारी, १९९५ बदलून तो दिनांक १ जोनवारी, २००० असा सुधारीत करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने झोपडीधारकांची पात्रता निश्चित करुन त्यांना ओळखपत्र देण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी गृहनिर्माण विभाग परिपत्रक दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ व शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०१५ अन्वये मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजना, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व झोपडपट्टी क्षेत्रासाठी लागू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावरोली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील कोप्रॉन कंपनी बंद करण्यात आल्याबाबत**

**(४१) २१००४ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरोली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील कोप्रॉन कंपनी कोणतेही कारण न देता बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-१०-२०१५) :** (१) दिनांक २९ एप्रिल, २०१३ पासून कामगारांनी त्यांच्या मागण्यासंदर्भात कारखान्यातील काम बंद केलेले आहे, त्यामुळे उत्पादन प्रक्रिया बंद आहे. तद् नंतर आस्थापना आजारी उद्योग म्हणून दिनांक १८ मार्च, २०१४ रोजी बीआयएफआरद्वारा घोषित झालेली आहे,

(२) होय, शासनामार्फत चौकशी केली आहे, आस्थापनेने औद्योगिक कलह कायदा १९४७ कलम २५ (ओ) अंतर्गत कारखाना बंद करण्यासाठी शासनाकडे सादर केलेला अर्ज फेटाळण्यात आला आहे. सदर प्रकरणी शासनाच्या विविध स्तरावर दिनांक ९ मे, २०१३, १६ मे, २०१३, २७ मे, २०१३, १५ जून, २०१३, १९ जून, २०१३ व २८ जून, २०१३ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. कामगारांच्या थकीत वेतनाबाबतची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ च्या ७ टप्प्यांच्या बांधकामाबाबत**

**(४२) २२४६४ (११-०८-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३.५२ किलोमिटर लांबीच्या मेट्रो-३ च्या ७ टप्प्यांच्या बांधकामासाठी ९ कंपन्यानी एकूण ३१ निविदा दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त काम कोणकोणत्या कंपन्याना देण्यात आले आहे,

(३) सदरहू मेट्रोच्या आरे कॉलनीतील प्रस्तावीत कार डेपोला मुंबईकरांचा विरोध आहे,

(४) असल्यास, यावर शासनाने तोडगा काढला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय,
(५) मेट्रो-३ च्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर कामासाठी कंत्राटदार नेमणूकीची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे,
(३) आरे कॉलनीतील प्रस्तावित कार डेपाला काही पर्यावरणवादी, बिगर शासकीय संस्था तसेच राजकीय पक्षांचा विरोध होत आहे,
(४) व (५) शासनाने आरे कॉलनीतील प्रस्तावित कार डेपो प्रकरणी एक तज्ञ समिती स्थापन केली असून सदर समितीने त्यांचा शिफारस अहवाल शासनास सादर केला असून शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## कारखाना अधिनियमात सुधारणा करुन महिलांना कारखान्यांमध्ये रात्रपाळीत काम करण्याची परवानगी देण्याच्या महत्वपूर्ण निर्णयाबाबत

**(४३) २२५५० (१४-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारखाना अधिनियमात सुधारणा करुन महिलांना कारखान्यांमध्ये रात्रपाळीत काम करण्याची परवानगी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्यसरकारतर्फे दिनांक २० मे, २०१५ रोजी घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी कारखान्यावर सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रात्रपाळीत महिला कामवर जात नसताना सुध्दा राज्यातील विविध भागात महिलांवर अत्याचार, विनयभंग असे प्रकार घडत आहेत व रात्रीच्या वेळी कामावर जाणा-या येणा-या महिलांसाठी हे असूरक्षित असल्याची जनतेची प्रतिक्रिया आहे,
(४) असल्यास, रात्रपाळीवर कामासाठी जाणा-या महिलांसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१०-२०१५) :** (१) होय.

दिनांक २० मे, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये महिला कामगारांना सायंकाळी ७.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत काम करण्यास असलेला प्रतिबंध शिथिल करणे, या तरतुदीचा समावेश आहे,
(२) व (३)

सुधारीत कायदा राज्यात लागू करताना रात्रपाळीत काम करण्यासाठी इच्छुक महिला कामगारांच्या पर्याप्त सुरक्षिततेसंदर्भात शासन काही मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करणार असून

त्याची ठोस अंमलबजावणी संबंधित उद्योजकांनी करणे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात येणार आहे.

सुधारीत कायद्याच्या अंमलबजावणीच्या वेळी संबंधित उद्योजकांकडून कार्यरत महिला कामगारांच्या सुरक्षिततेसंदर्भात काळजी घेण्यात येत असल्याचे हमी घेण्यात येत असल्यामुळे अशा महिलांच्या असुरक्षिततेबाबतचा प्रश्न उद्भवणार नाही.

(४) महिला कामगांराच्या सुरक्षिततेबाबत मा.मद्रास उच्च न्यायालयाने न्यायनिर्णयात विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील अटी आणि शर्ती तसेच त्याव्यतिरिक्त अन्य सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजनांच्या विवक्षित अटींच्या अधीन राहून रात्रपाळीत काम करण्याची मुभा देण्यात येणार असून त्यामध्ये घरापासून कारखान्यापर्यंत वाहतूक व्यवस्था यासारख्या सुविधांचा समावेश आहे.

---

**रामटेक (जि.नागपूर) तालुका लगतच्या मनसर माइन्स व कांद्री माइन्स या उत्खन्नालगतच्या क्षेत्रातील तीव्र पाणी टंचाईबाबत**

**(४४) २२८२४ (११-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुका लगतच्या मनसर माइन्स व कांद्री माइन्स या उत्खननालगतच्या क्षेत्रात तीव्र पाणी टंचाई माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या माईन्स कंपन्यांच्या मालकांनी लगतच्या गावांतील लोकांना कोणत्याच मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात लेखी निवेदन कंपनीचे प्रबंधक व संबंधित अधिकाऱ्यांना वांरवार दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनानुसार या भागातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता तसेच अन्य नागरी सुविधा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) खाणपट्टा धारक मे. मॉईल लि. यांनी सदर खाणीलगतच्या मौजा. मनसर, बनपुरी, नगरधन, काचुरवाही, कोथुर्णा इ. गावांतील स्थानिक लोकांना कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधी करीता सुमारे रु . ८५५.६६ लक्ष ची तरतुद केली आहे. तसेच सदर खाणीलगतच्या क्षेत्रामध्ये सन २०१४-१५ मध्ये १५ बोअरवेल्स व सन २०१५-१६ मध्ये १८ बोअरवेल्स अशा एकूण ३३ बोअरवेल्स उभारलेल्या असून त्याकरिता रु. २४.७५ लक्ष खर्च आला आहे. तसेच

खाणीलगतच्या क्षेत्रातील सिमेंट रस्ता, डांबरी रस्ता, शाळेसाठी वर्गखोली, शाळेत डेस्क बेंचेस, मुलींसाठी शौचालय तसेच रामटेक येथील गडमंदिरासाठी वाटर कुलरची उभारणी केली आहे. लाईट टु लाईव्हज या कार्यक्रमा अंतर्गत मे.सुरज आय इन्स्टिट्युट व लता मंगेशकर हॉस्पिटल, नागपूर यांच्या सहकार्याने विविध मोतीबिंदू शस्त्रक्रिया व स्थानिक गरजू लोकांना मोफत चष्मा वितरण केले जाते. याकरिता मे. मॉईल लि. कंपनीने रु. ३५ लक्ष ची तरतुद केली आहे. मे. मॉईल लि. या कंपनीने उपरोक्त नमूद क्षेत्रातील गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता व नागरी सुविधा पुरविण्याकरिता सुमारे १२०४.५४ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यात अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या बेरोजगारांना बिज भांडवली कर्ज देण्यास बँक टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(४५) २२८४१ (३०-०७-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने बेरोजगारांना देण्यात येणारी बीज भांडवल योजनेची ४४ प्रकरणे मंजूर करुन ती बँकाकडे पाठविल्यानंतर संबंधित बँकाकडून कर्ज देण्यास टाळाटाळ केली जात असल्याची तक्रार अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील १७१ कर्ज प्रकरणांसाठी शासनांकडून बँकांना अनुदान दिले असतांना अनेक सुशिक्षित बेरोजगारांना बँकांनी कर्ज नाकारले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तदनुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) काही सुशिक्षित बेरोजगारांना बँकेने कर्ज नाकारले आहे. परंतु, सुशिक्षित बेरोजगारांना कर्ज देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून किंवा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कोणतेही अनुदान बँकाना दिले जात नाही. लाभार्थ्यांच्या पात्रतेप्रमाणे कर्ज मंजूर करणे हा बँकेच्या अखात्यारीतील विषय आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील ट्रेड आणि**
**अभ्यासक्रमामध्ये बदल करण्याबाबत**

**(४६) २३६१० (३०-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील ट्रेड आणि अभ्यासक्रमामध्ये फारसा बदल न झाल्याने या ठिकाणाहून प्रशिक्षण घेणाऱ्यांना रोजगाराच्या संधी कमी मिळत असल्याने आयटीआयमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्याही कमी होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयटीआयचे अभ्यासक्रम नवीन रोजगाराच्या संधीप्रमाणे नसल्याने सदरहू शैक्षणिक कोर्समध्ये बदलाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन रोजगाराच्या संधीप्रमाणे आयटीआयच्या शैक्षणिक कोर्समध्ये बदल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) अशंतः खरे आहे.

(३) रोजगार आणि प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्लीच्या निर्देशाप्रमाणे औ.प्र.संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांत बदल करण्यात येवून त्याचे अवलंब करणे बंधनकारक असते. त्यांच्याकडून तयार करण्यात येणा-या नवीन व्यवसायांचा अभ्यासक्रम राज्यातील औ.प्र. संस्थांमध्ये लागू करण्यात येवून त्यानुसार प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरात आयटीआयच्या ॲप्रेटीसशिप परिक्षेतील इलेक्ट्रीशियन व फिटर या ट्रेडचे**
**प्रश्नपत्रिकेतील प्रश्न विद्यार्थ्यांना आठवडाभरापूर्वीच मिळाल्याबाबत**

**(४७) २३७७१ (१०-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात राज्यात एकाच वेळी होणाऱ्या आयटीआयच्या ॲप्रेटीसशिप परिक्षेतील इलेक्ट्रीशियन व फिटर या ट्रेडचे प्रश्नपत्रिकेतील प्रश्न विद्यार्थ्यांना आठवडाभरापूर्वीच मिळाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.

दि. २४.०४.२०१५ रोजी पेपर सुरू झाल्यानंतर एका प्रशिक्षणार्थ्याकडे झेरॉक्स प्रत आढळून आली. त्या अनुषंगाने संस्था स्तरावरून जिल्हा पेठ पोलीस स्टेशन, जळगांव येथे घेतलेल्या घटनेच्या चौकशीसाठी एफ.आय.आर. क्र. ४४/१५ दि.२४.०४.२०१५ अन्वये गुन्हा दाखल केलेला असून पुढील तपास जिल्हा पेठ पोलीस स्टेशन, जळगाव यांच्याकडून करण्यात येत आहे.
(३) जिल्हा पेठ पोलीस स्टेशन, जळगाव यांचेकडून पुढील तपास सुरू आहे.

---

### ज्ञानेश्वर नगर, महाराष्ट्र नगर वांद्रे (पूर्व) मुंबई येथील रस्त्यावरील काही झोपड्यांसहित शौचालये मिठीनदी विस्तारासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निष्कासित केल्याबाबत

**(४८) २६११९ (१०-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ज्ञानेश्वर नगर, महाराष्ट्र नगर वांद्रे (पूर्व) मुंबई येथील रस्त्यावरील काही झोपड्यांसहित शौचालये मिठीनदी विस्तारासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निष्कासित केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नगरात अजूनही ४ ते ५ हजार झोपड्या असून ४० हजार लोकवस्ती असल्याने पाडलेली शौचालये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून बांधण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिकारी यांच्याकडे करुनही अद्याप कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१५) :**(१) होय हे खरे आहे,
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ज्ञानेश्वर नगर येथे एफआरपीची ५ युनिटची ४ शौचालये बसविण्यात आली असून सद्य:स्थितीत या ४ शौचालयांचा वापर सुरु आहे.

---

### वसई-विरार उपप्रदेशतील विरार ते नायगाव व वैतरणा ते जूचंद्र ह्या रेल्वेला समांतर असणारे रस्ते विकसित करणेबाबत

**(४९) २७३४१ (१०-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई),**

**श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने वसई-विरार उपप्रदेशातील विरार ते नायगांव व वैतरणा ते जूचंद्र ह्या रेल्वेला समांतर असणारे रस्ते विकसित करण्याबाबत सविस्तर प्रकल्प व अहवाल नकाशा मा.मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर कामाला किती कालावधीत कामे सुरु होण्याची अपेक्षा आहे,

(३) या दोन्ही रस्त्यामुळे जनतेचा अमुल्य वेळ व राष्ट्रीय संपत्ती असणाऱ्या इंधनाची प्रचंड मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) वसई विरार महानगरपालिकेने सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे मेसर्स टन्डन अर्बन सोल्युशन प्रा.लि या सल्लागारामार्फत तयार करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केले असून सदर प्रकल्पाचा प्राधिकरणाच्या स्तरावर अभ्यास सुरु आहे

(४) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

## मुंबई शहरातील कारखान्या।ना बी.आय.आर. कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत

**(५०) २७७३५ (३१-०७-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनास मुंबई शहरातील कारखान्यांना बी.आय.आर. कायद्याच्या कक्षेत आणण्याचा अधिकार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई औद्योगिक कलम कायदा, १९३८ च्या कक्षेमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा समावेश करण्यात आलेला नाही, मात्र बेस्ट उपक्रम हा कारखाना नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अंगीकृत उपक्रम असतानाही त्यात मुंबई औद्योगिक संबंध कायदा व अधिनियम लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्ट उपक्रमास मुंबई औद्योगिक संबंध कायदा व अधिनियम यांच्या व्याप्तीतून सवलत मिळण्यासाठी उपक्रमाने सचिव (कामगार, उद्योग व उर्जा) यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-१०-२०१५) :**(१) महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन एखाद्या स्थानिक क्षेत्रासाठी त्यामध्ये

एखाद्या उद्योगासाठी सदरहू अधिनियम लागू करण्याकरिता अधिसूचना निर्गमित करून शकते, हे खरे आहे.

(२) उल्लेख केल्याप्रमाणे कायदा अस्तित्वात नसून महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन एखाद्या स्थानिक क्षेत्रासाठी त्यामध्ये एखाद्या उद्योगासाठी सदरहू अधिनियम लागू करण्याकरिता अधिसूचना निर्गमित करू शकते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे संपूर्ण राज्यात कार्यान्वित आहे. बेस्ट उपक्रम हा मुंबई व मुंबई उपनगरे येथे कार्यान्वित आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ लागू नाही. बेस्ट उपक्रमाला सन १९८४ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ लागू करण्यात आला आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) याबाबत शासतस्तरावर दि.३/७/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.